1. **Pradhan Mantri Kaushal Vikas Yojna**



प्रधानमंत्री कौशल विकास योजनेतंर्गत विविध विभागामधील उपस्थित प्रशिक्षणार्थी.

## वेळणेश्वर येथे प्रधानमंत्री कौशल विकास योजनेचा शुभारंभ

**पालशेत :** भारत सरकारच्या प्रधानमंत्री कौशल विकास योजनेचा शुभारंभ नुकताच गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथील महर्षी परशुराम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयात पार पडला. यामध्ये मार्बल ग्रेनाईट आणि स्टोन, इलेक्ट्रॉनिक दुरुस्ती व संगणक समन्वयक यासारख्या विभागामधील नोंदणीकृत प्रशिक्षणार्थींनी हजेरी लावली. विद्यार्थ्यांसह पालकांनी या काग्रक्रमाला लाभ घेतला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे मुकुंद शेवडे यांनी औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षिततेचे महत्त्व, बदलते उद्योगविश्व आणि त्याचा शैक्षणिक क्षेत्राशी असणारा संबंध या विषयीचे विचार मांडले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी देखील शैक्षणिक क्षेत्रातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांनी हे का गांभीर्याने घेतले पाहीजे, या विषयी चर्चा केली. तर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा कामत यांनी या उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्या प्रसारक मंडळाचे विविध उपक्रम व त्या माध्यमातून समाजाला होणाऱ्या अमूल्य लाभाचा धावता आढावा घेतला.

